# धैर्य संयम

सत्कर्म करणारा एखादा सत्पुरुष रस्त्यावरून जात असतो. कुठलेही कारण नसताना काही गुंडप्रवृत्तीचे लोक त्याला धरतात आणि बेदम मारहाण करतात. कर्माच्या नियमांचा योग्य अभ्यास आणि चिंतन झाले असल्याकारणाने तो सत्पुरुष या घटनेला शांतपणे सामोरा जातो आणि सत्कर्म करण्याच्या आपल्या निश्‍चयाला दृढपणे पुढे नेतो. मात्र जनसामान्यात याची उलट प्रतिक्रिया उमटते. ‘हा एवढा मोठा भक्त, एवढा सत्कर्मी, एवढी वर्षे सेवा करतोय आणि त्याला एवढा ताप का भोगावा लागला?’ अशी चर्चा होते. सामान्य मनुष्याच्या आयुष्यात तर असे अनेकवेळा होते. सत्कर्म सुरू केल्यानंतर काही वेळा त्याच्यावर संकटांची मालिका कोसळू लागते आणि मग त्या मनुष्याला वाटू लागते, ‘मी एवढी सत्कर्म करतोय, तरी माझ्यावर संकटे येतातच कशी? मी आता देवाचं नावही घेणार नाही!’ यालाच सत्कर्म-विन्मुख होणे म्हणतात, ज्यामुळे त्या मनुष्याचं अपरिमित पारमार्थिक नुकसान होतं, अशी सत्कर्म-विन्मुखता टाळण्यासाठी, कर्मनियमांचं आणि त्यानुसार उद्भवणाऱ्या सुख-दु:खाचं योग्य ज्ञान करून घेणं आवश्यक आहे.

जन्मास आलेली कोणतीही व्यक्ती दु:खाच्या कचाट्यातून सुटलेली नाही. मनुष्यप्राणी जन्मभर सुख-दु:खाच्या हिंदोळ्यांवर झुलत असतो. प्राचीन हिंदू तत्त्वज्ञानानुसार मनुष्य जीवनात येणाऱ्या दु:खांना त्रिविध ताप असं म्हणतात. आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक असे या तापत्रयींचं नामकरण केले आहे. समर्थ रामदास स्वामींनी या प्रत्येक तापावर स्वतंत्र समासाची रचना दासबोधात केली आहे. यातील आध्यात्मिक ताप कधी कधी सत्कर्म करणाऱ्या मनुष्याच्या बाबतीत उद्भवतो. सत्कर्म केल्यामुळे ताप होणं, दु:ख निर्माण होणं ही देवाघरची उलटी रीत नसून, दूषित कर्माच्या निचऱ्याची ती अत्यंत न्याय्य अशी व्यवस्था आहे. कर्माचे नियम गहन आहेत, पण ते समजून घेतले तर त्यातील न्याय लक्षात येतो. दुष्कर्माचे आणि सत्कर्माचे, असे दोन्हींचे फळ मनुष्याला कधी ना कधी तरी भोगावेच लागते असे हिंदू तत्त्वज्ञान सांगते.

भौतिकशास्त्राच्या नियमांनुसारसुद्धा प्रत्येक क्रियेला तेवढ्याच तीव्रतेची उलट प्रतिक्रिया घडत असते. भौतिक सृष्टीतील जड वस्तूच्या बाबतीत ही प्रतिक्रिया तत्काळ घडते, मात्र अजड अशा मानवी मनाच्या हस्तक्षेपामुळे, आध्यात्मिक सृष्टीतील सत्कर्म आणि दुष्कर्माच्या प्रतिक्रिया म्हणजेच त्यांची फळे मिळण्यास मध्ये काही काळ जातो. अजड असे मानवी मन जसे दुष्कर्माचे फळ ताबडतोब मिळू देत नाही तसेच सत्कर्माचे फळही मनुष्याला तत्काळ मिळत नाही. असे कर्माचे फळ जर ताबडतोब मिळाले असते तर कोणाच्याही हातून दुष्कर्म घडलेच नसते आणि सगळे उद्धरून गेले असते!

आध्यात्मिक उन्नती होण्याकरिता कर्मसाम्यदशा प्राप्त होणे आवश्यक असते. म्हणजेच कर्मांची नव्याने भर न घालता, पूर्वसंचित दुष्कर्म आणि सत्कर्मांची फळं भोगून संपवावी लागतात. सत्कर्म करायला जेव्हा मनुष्य सुरुवात करतो तेव्हा काही वेळा आत्म्याभोवती साठलेली अनेक जन्मांच्या पूर्वसंचित पापाची फळं संकटरूपाने बाहेर पडायला सुरुवात होते, ज्याला पापनिष्कृती होणे असे म्हणतात. अशी पापनिष्कृती होणे आणि ती सहन करणे हे भक्ताच्याच हिताचं असतं, कारण त्याद्वारे त्याची दुष्कर्म गुणाकाराने जळून जात असतात, संपत असतात. सत्कर्मामुळे ताप कसा निर्माण होतो हे समजण्यासाठी व्यवहारातील एक उदाहरण देता येईल. समजा तळाशी पाणी असलेली एखादी बाटली आहे. या बाटलीला बाह्य बाजूने दाब दिला असता त्यातील पाण्याची पातळी उंचावते. हा दाब अधिक वाढला तर बाटलीच्या मुखावाटे पाणी बाहेर पडू लागते आणि बाटली रिकामी होऊ लागते. नेमकी हीच प्रक्रिया मनुष्याच्या आध्यात्मिक जीवनात घडते. सत्कर्माच्या रेट्यामुळे प्रारब्धरूपी बाटलीतील अनेक जन्मांची साठवलेली दूषित कर्म वर येतात आणि संकटरूपाने मनुष्यावर कोसळू लागतात. सत्कर्मामुळे होणारा दूषित कर्मांचा तो निचरा असतो. या आध्यात्मिक तापाचं वर्णन समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात केलं आहे.

ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्व पापांचा संताप ।<br>
सांगता सरेना अमूप । दु:ख सागर ।।<br>
(दासबोध ३.६.५५)

साधनेमुळे होणारा आध्यात्मिक ताप हा मनुष्याच्या भविष्यकालीन कल्याणासाठी उपकारकच असतो. आपल्या अंगावर एखादे गळू झाले तर त्याला गोंजारत बसण्याऐवजी मनुष्य डॉक्टरकडे जाऊन ते काढून घेतो. तद्वतच सत्कर्मामुळे होणारा, प्रारब्धाच्या गळवातील पापांचा निचरा मनुष्याच्या भविष्यकालीन मन:स्वास्थ्यासाठी आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी आवश्यक असतो. गळवाची शस्त्रक्रिया केवळ काही काळाची आहे, त्यानंतर आपल्याला बरे वाटणार आहे, हे ज्ञान ज्याच्या पचनी पडेल तो तत्कालिक दु:खाला न घाबरता, सत्कर्माच्या वाटेवरची मार्गक्रमणा धैर्य आणि संयमाने सुरू ठेवेल.

(वासुदेव वामन बापट गुरुजी ओम सद्‌गुरू प्रतिष्ठानच्या बदलापूर, खोपोली आणि बोरिवली स्थानांवर गुरूपदी विराजमान आहेत. संपर्क bhende@indiatimes.com)

- बापट गुरुजी